MHOS130007152024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.240/2024</u>**
**<u>सुमल शेरे वि. बळीराम लिमकर</u>**
**<u>निशाणी क्र.१४ च्या अर्जावरील आदेश</u>**

सदरचा अर्ज हा वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांनी कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण वादीने प्रतिवादींचे विरुद्ध मौजे आंद्रुड व निपाणी ता. भूम येथील विवाद्य मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. वादी ही महिला असून ती अडाणी व भोळसर असल्यामुळे दावा दाखल करतेवेळी तिला संपूर्ण मिळकतीची माहिती मिळाली नाही. परिणामी मौजे आंद्रुड ता. भूम येथील जमीन गट नं. ५१७ मधील ००–६९ आर हे क्षेत्र दाव्यामध्ये समाविष्ट करावयाचे राहून गेले आहे. सदर मिळकतीत वादीचा कायदेशीर हिस्सा असल्याने ती दाव्यात समाविष्ट करणे व त्यानुसार दाव्याचे मूल्यांकन असलेल्या पॅरा नं. ५ मध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही. अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे नसल्याने, त्यांच्या म्हणण्याविना कामकाज चालविण्यात आले.

४. अर्जाचे अवलोकन केले. वादींचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणात वादींनी वादमिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. दावा व त्यातील मागणीचे स्वरुप तसेच राहून गेलेल्या मिळकतीचा विचार करता, दाव्यातील वादग्रस्त प्रश्नांचा अंतिम आणि सविस्तर निकाल करण्यासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. या दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूप बदलत नाही. तसेच प्रतिवादींनी अर्जास कोणताही विरोध केलेला नाही. त्यामुळे वादींना दुरुस्तीची परवानगी न दिल्यास दाव्यात अनेकता निर्माण होऊन गुंतागुंत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यास कोणतीही कायदेशीर बाधा नाही. सबब, सर्व बाबी लक्षात घेता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

| **<u>आ दे श</u>** | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज **नि.क्र.१४** हा मंजुर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | वादी यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. |
| ३. | वादी यांनी अर्जात नमुद केलेली दुरुस्ती ही आदेशाच्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत करावी व दाव्याची दुरुस्तीप्रत अभिलेखावर दाखल करावी. |
| ४. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

स्वाक्षरीत/-

दिनांक : १३.०८.२०२६

(**श्रीमती ए. बी. जोंधळे**)

ठिकाण : भूम.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Hingmire, (Grade-III) |
| Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Bhoom |
| Date | :- | 13.08.2026 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 13.08.2026 |
| Order uploaded on | :- | 13.08.2026 |